आजचे कार्यक्रम

जैन श्वेतांबर स्थानकवासी श्री संघ आणि प्रीतिसुधाजी शिक्षण फंडातर्फे पुरस्कार प्रदान सोहळा
स्थळ : गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेज रोड
वेळ : सकाळी ८.३० वाजता

नाशिक कवी आयोजित कै. प्रा. डॉ. सुरेश मेणे स्मृती राज्यस्तरीय काव्यसंग्रह व काव्यलेखन स्पधेचा पारितोषिक वितरण समारंभ
स्थळ : अभ्यंकर सभागृह, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था
वेळ : दुपारी २ वाजता

विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते,पदाधिकारी यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश सोहळा
स्थळ : रावसाहेब थोरात सभागृह, के.टी.एच.एम कॉलेज शेजारी, नाशिक.
वेळ : दुपारी १ वाजता.

आदि शबरी फाऊंडेशन आदिवासी संस्कृती पुढे नेईल : बनसोड

नाशिक । प्रतिनिधी

आदिवासी बांधवांची संस्कृती जपणे आणि ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे तसेच शबरी नॅच्युरल्स ब्रँडचे काम पुढे नेणे या उद्देशाने स्थापन झालेले आदि शबरी फाऊंडेशन आदिवासी संस्कृतीचे संवर्धन आणि विकास नक्कीच करेल, असा विश्वास आदिवासी विकास आयुक्त तथा शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी व्यक्त केला.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या परिषद सभागृहात आयोजित संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला महाव्यवस्थापक जयरेखा निकुंभ, चैत्राम पवार, किरण पवार, प्रकाश मोंढे, छगन भुसारे, शांताराम वारे, अंकुश रन, कंपनी सचिव गणेश भदुरे, सनदी लेखापाल योगेश कटारिया आदी उपस्थित होते. बैठकीत फाऊंडेशनच्या कंपनी नोंदणी प्रमाणपत्राला मंजुरी देण्यात आली. चैत्राम पवार यांची संचालक मंडळाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली. आर्थिक व्यवहारांसाठी बँकेत चालू खाते उघडण्यास मान्यता मिळाली.

याशिवाय, मेमोरंडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन मंजूर करण्यात आले.पहिले संचालक आणि सांविधिक लेखापरीक्षक यांची नियुक्ती झाली. रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट यांच्या नियुक्तीसाठी कोटेशनच्या आधारावर निर्णय होईल. सर्व कायदेशीर बाबींचे पालन करणे अनिवार्य असेल या निर्णयांमुळे फाऊंडेशनच्या कार्याला गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

> आदि शबरीच्या संचालक मंडळाने आणि विशेषतः शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ ने माझ्यावर विश्वास व्यक्त करत आदि शबरी फाउंडेशनचे पहिले अध्यक्ष म्हणून नेमणूक केली त्याबद्दल आभारी आहे.
> **– पद्मश्री चैत्राम पवार अध्यक्ष, आदि शबरी फाउंडेशन**

'नावा'च्या अध्यक्षपदी कुलकर्णी; सरचिटणीसपदी निकम

नाशिक । येथील जाहिरात संस्थांची संघटना नाशिक ॲडव्हर्टायझिंग एजन्सीज वेल्फेअर असोसिएशन (नावा) च्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.

अध्यक्षपदी अमोल ॲडव्हर्टायझिंगचे संचालक अमोल कुलकर्णी, तर सरचिटणीसपदी वत्सदा ॲडव्हर्टायझिंगचे संचालक दिलीप निकम यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा हॉटेल करी लिव्हज भवन येथे संपन्न झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. भाऊसाहेब गंभीरे यांनी काम पाहिले. यावेळी नावाचे संस्थापक अध्यक्ष मोतीराम पिंगळे, मावळते अध्यक्ष प्रवीण चांडक, फेमचे अध्यक्ष रवी पवार व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी विठ्ठल राजोळे, प्रविण चांडक, दीपक जगताप, पराग गांधी, योगेश पगारे, सुभाष लगली, तन्मय जोशी, महेश कलंत्री, प्रताप पवार, श्रीकांत नागरे, धनंजय मोहाडकर, किरण पाटील, मिलिंद महाजन, प्रवीण मराठे, सतीश बोरा, विठ्ठल देशपांडे, कैलास खैरे, अनिल अग्निहोत्री आदी सदस्य उपस्थित होते.

कार्यकारिणी

उपाध्यक्ष सुनील महामुनी व साहिल न्याहारकर, चिटणीस नितीन शेवाळे, खजिनदार राजेश शेळके, कार्याध्यक्ष गणेश नाफडे, जनसंपर्क संचालक श्याम पवार, सल्लागार संचालक डॉ. अभिजीत चांदे तर कार्यकारणी सदस्य दिनेश गांधी, शैलेश दगडे, किशोर खैरनार

व्हॉईस ऑफ गोल्डन मैफल उद्या

नाशिक । येथील ए.एन.कराओके क्लब आणि शब्बीरकुमार फॅन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने व्हॉईस ऑफ गोल्डन एरा अर्थात सुरेल स्वरांचे सुवर्णयुग या विनामूल्य मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २८) परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सायंकाळी ६ वाजता ही मैफल होईल अशी माहिती संयोजक नितीनकुमार चव्हाण यांनी दिली.

निवृत्तिनाथांच्या पालखीचे पाथर्डीत स्वागत

इंदिरानगर । संतश्रेष्ठ श्री निवृत्तिनाथ महाराजांच्या परतीच्या पालखीचे पाथर्डी गाव सर्कल येथे ग्रामस्थांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. जेसीबीमधून फुलांची उधळण करण्यात आली.

प्रतिवर्षी श्री संत निवृत्तिनाथ महाराजांची पालखी सिन्नर, देवळाली, विहीतगाव, पिंपळगाव खांब, पाथर्डी गाव, अंबडनंतर पिंपळगाव बहुला येथे मुक्काम करून रविवारी त्र्यंबकेश्वरकडे रवाना होणार आहे. पाथर्डीकर ग्रामस्थाच्या वतीने पालखीत सहभागी झालेल्यांचे सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या वतीने माजी नगरसेवक सुदाम डेमसे, भगवान दोंदे, सुदाम कोंबडे सोसायटीचे चेअरमन तानाजी गवळी, खंडू धोंगडे, सुनील कोथमिरे व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांचे तबला वादन स्पर्धेत यश

नाशिक । प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्था आयोजित गुरु-शिष्य परंपरा स्पर्धा नुकतीच पार पडली.

शालेय स्तरावर होणाऱ्या वाद्य वादन स्पर्धेत मोठ्या गटात पवार तबला अकॅडमीचे विद्यार्थी राघव मालपाठक (नाशिक केम्ब्रिज स्कूल इंदिरानगर), राधेय तांबट (निर्मला कॉन्व्हेंट हायस्कूल), स्मित मेढे(सेंट फिलोमिना हायस्कूल, नाशिकरोड) यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, उतेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले आहे. शहरातील १५ शाळेतील सुमारे ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांना अकॅडमीचे नितीन पवार, अमित भालेराव, आशुतोष इप्पर यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षक म्हणून व्यंकटेश ढवण व सुहास बेरी यांनी काम पाहिले.

पंजाब नॅशनल बँकेचा एमएसएमई आऊटरीच प्रोग्राम

नाशिक । पंजाब नॅशनल बँकेच्या वतीने नाशिक येथील उद्योजक, उत्पादक, व्यापारी, सेवा पुरवठादार आणि कंत्राटदारांसाठी 'एमएसएमई आऊटरीच प्रोग्राम'चे आयोजन आईमा रिक्रिएशन सेंटर येथे करण्यात आले.

यावेळी उद्योगविश्वाच्या समृद्धीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण, महत्त्वाच्या योजनांची माहिती आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपस्थितांना मिळाले. प्रमुख अतिथी म्हणून आयमा अध्यक्ष ललित बुब, उपाध्यक्ष प्रमोद वाघ, पंजाब नॅशनल बँकेचे हेड ऑफिस महाव्यवस्थापक मनोज श्रीवास्तव, नाशिक सर्कल मंडळप्रमुख अभिजित सिन्हा यांनी उद्योजकांना मार्गदर्शन केले.

एमएसएमई क्षेत्रासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांचे सविस्तर मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. त्यामध्ये एकत्रित योजना अंतर्गत उत्पादक, व्यापारी व सेवा पुरवठादार यांना १०० कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज स्पर्धात्मक व्याजदराने उपलब्ध, किमान तारण आवश्यकता, प्रारंभिक शुल्कावर ५० टक्के सवलत, बीजी/एलसी कमिशनवर २५टक्के सवलत, मर्यादेत स्वयंचलित वाढीची सुविधा, ओपन टर्म कर्ज, यांसारख्या अनेक सुविधांचा समावेश करण्यात आला. या उपक्रमाद्वारे बँकेच्या विविध विभागातील अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून, पात्रतेची त्वरित तपासणी आणि आवश्यकतेनुसार जागेवरच कर्जमंजुरी पत्र देण्यात आले.

खुर्चीसाठी शनिदेवाचा धावा

(पान १ वरुन) गेल्या काही महिन्यांपासून कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे शेतकऱ्यांविषयीची कथित वादग्रस्त वक्तव्ये आणि विधिमंडळात पत्ते खेळतानाच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे चर्चेत आहेत. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर कोकाटे यांचा नंदुरबारचा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. तालुक्यातील शनीमांडळ गावात भेट देवून कोकाटे हे शनिचरणी लीन झालेले दिसून आले. त्यांनी मंदिरात विधीवत पूजा करून शनिदेवाचा अभिषेक केला. यावेळी त्यांनी लोकांवरची साडेसाती दूर व्हावी, सोबतच आमच्यावरचेही संकट दूर करा, अशी प्रार्थना त्यांनी केली. देशातील साडेसाती मुक्त देवस्थान म्हणून शनीमांडळची ख्याती असल्याने, राजकीय अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी कोकाटे यांनी शनिदेवाला साकडे घातल्याचे बोलले जात आहे. यावेळी कोकाटे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजीत मोरे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कोकाटे यांच्यावरील राजकीय दबाव वाढत असताना, त्यांनी साधलेला हा धार्मिक दौरा त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी कोणता संकेत देतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील शनीमांडळ येथे प्रसिद्ध शनिदेवाचे मंदिर असून हे मंदिर साडेसाती आणि शनिदोषापासून मुक्ती देणारे जागृत देवस्थान मानले जाते. देशभरातून भाविक येथे दर्शनासाठी आणि आपल्यावरील संकटे दूर व्हावीत म्हणून प्रार्थना करण्यासाठी येत असतात. त्यामुळे अनेक राजकीय नेतेही येथे दर्शनासाठी येत असल्याचे दिसून येते.

समर्थकांचे आंदोलन स्थगित

आपल्या समर्थनार्थ कुणीही आंदोलन करू नये, असे आवाहन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केल्याने कोकाटे समर्थकांनी शनिवारी पुकारलेले निषेध आंदोलन स्थगित करण्यात आले.कोकाटे यांची बदनामी करत त्यांच्याबद्दल राज्यभर गैरसमज पसरवणाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आज बसस्थानकाजवळ जमण्याचा निर्णय कोकाटे समर्थकांनी घेतला होता.

मंत्रिमंडळात बिनकामाचे मंत्री : राऊत

महायुती सरकारमधील मंत्रिमंडळात ७५ टक्के मंत्री हे बिनकामाचे आणि ते मंत्री म्हणून नाही तर दरोडेखोर म्हणून काम करतात.फडणवीस यांच्यासारखा चारित्र्यवान माणूस असे सगळे सहन करतो हे धक्कादायक वाटते. सध्या असलेले मंत्रिमंडळ बरखास्त करून त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता आहे, असे टीकास्त्र शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सोडले.

'रायझिंग स्टार ॲवॉर्ड' सोहळा उद्या 'व्हिएतनाममध्ये' रंगणार

(पान १ वरुन) जगभरातील पर्यटकांचे आकर्षण बनलेले व आशिया खंडातील 'युरोप' म्हणून नावारूपास येऊ लागलेल्या 'व्हिएतनाम'मधील 'दा नांग' या शहरातील समुद्र किनाऱ्यावरील नयनरम्य अशा तारांकित हॉटेलमध्ये म रायझिंग स्टार ॲवॉर्डफ सोहळा होत आहे. व्हिएतनाम पर्यटन प्रोत्साहन केंद्राच्या उपसंचालक माई थी थान खास या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

प्रतिष्ठेच्या या सोहळ्यात 'देशदूत'चे संपादक शैलेंद्र तनपुरे, जाहिरात महाव्यवस्थापक अमोल घावरे, सहायक जाहिरात महाव्यवस्थापक (ग्रामीण) सचिन कापडणी उपस्थित राहतील.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३३७ कोटींचा निधी

(पान १ वरुन) शेतकऱ्यांच्या ४५ हजार ९३५.१६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ८५ कोटी ६७ लाख ८ हजार, कोकण विभागातील १३ हजार ६०८ शेतकऱ्यांच्या ४ हजार ४७३.६९ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ९ कोटी ३८ लाख २४ हजार, अमरावती विभागातील ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांच्या ३६ हजार १८९.८६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ६६ कोटी १९ लाख ११ हजार आणि नागपूर विभागातील ५० हजार १९४ शेतकऱ्यांच्या २० हजार ७८३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ३४ कोटी ९१ लाख ६३ हजार रुपये मदतीचा समावेश आहे.

क्रेडाई उपक्रमातून वृक्षारोपण मोहीम

नाशिक । बांधकाम व्यावसायिकांची अग्रणी संस्था असलेल्या क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे नेहमीच सामाजिक उत्तरदायित्वातून वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. या अंतर्गत आदित्य डेव्हेलपर्सच्या सहकार्याने हरित नाशिकसाठी वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

जयभवानी रोड येथील निसर्गोपचार केंद्राजवळ ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी अध्यक्ष गौरव ठक्कर, महापालिका आयुक्त मनीषा खत्री उपस्थित होत्या.

तुळजा भवानी मंदिर विकासकामांचे भूमिपूजन

नाशिकरोड । प्रतिनिधी

जयभवानी रोड येथील तुळजाभवानी मंदिर देवस्थानात आ. राहुल ढिकले यांच्या निधीतून एक कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

माजी नगरसेवक संभाजी मोरुस्कर, सूर्यकांत लवटे, अंबादास पगारे, ज्योती खोले, संगीता गायकवाड, कोमल मेहरोलिया, रमेश धोंगडे, देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे, रवी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. ढिकले यांचे औक्षण वैशाली सहाणे, रोहिणी पाटोळे, सुनिता गायकवाड, कीर्ती जाचक, सुरेखा गायकवाड, वंदना कदम यांनी केले. मंदिराचे सहसचिव कैलास कदम, आ. ढिकले यांची भाषणे झाली. देवस्थानचे अध्यक्ष शिवाजी सहाणे यांनी जागा मिळविण्यापासून ते मंदिर उभारण्यापर्यंत काय अडचणी आल्या याविषयी माहिती दिली. आ. ढिकले म्हणाले की, मी आजारी असताना मतदार संघात मतदारांनी पुन्हा काम करण्याची संधी दिली. विकासकामांबरोबर मतदार संघातील सुमारे पन्नास देवस्थानांना शासनाकडून निधी मंजूर करून घेतला. अनेक कामे पूर्ण झाली आहे तर काही सुरू आहेत. देवस्थानांसाठी केलेल्या कामाममुळे मी आजारांवर मात करु शकलो.

कार्यक्रमास योगेश भगत प्रदीप देशमुख, नितीन खोले, शांताराम घंटे, देवस्थानचे सचिव सुभाष पाटोळे, कार्याध्यक्ष किशोर जाचक, उपाध्यक्ष रमेश थोरात, खजिनदार राजेंद्र गायकवाड, किरण सहाणे, बाळासाहेब गायकवाड, दिलीप कदम, शिवाजी कदम, बाळासाहेब चव्हाण, शिवाजी लवटे आदींसह भाविक उपस्थित होते. तुळजाभवानी मातेची आरती करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून भूमिपूजन करण्यात आले.

लोढाकडेच सीडी म्हणून फौज वेडीपिसी!

(पान १ वरुन) जोपर्यंत प्रफुल्ल लोढाकडे काय आहे हे सरकार सांगत नाही तो पर्यंत सुरुच राहील.कारण अनेकदा म्हटले होतें की, तुम्ही ईडी लावली तर मी सीडी लावणार, ती सीडी प्रफुल्ल लोढा हाच मला देणार होता,त्यानंतर तुम्ही त्याला पुन्हा भाजपत घेत प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. अन् आता बचावासाठी सारी फौज पुढे केली, असा पलटवार खडसे यांनी केला.

मला आनंद वाटला असता ही पत्रकार परिषद शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी, कर्जमाफी विषयी झाली असती तर, परंतु ही पत्रकार परिषद नाथाभाऊंना टार्गेट करण्यासाठी आमदारांना आणि इथल्या मंत्र्यांना घ्यावी लागली, त्यांना ही पत्रकार परिषद का घ्यावी लागली? त्यांची मजबुरी मी समजू शकतो. मला या आमदारांवर फार काही बोलायचं नाही, कारण आता जे आमदार आहेत, त्यांना मीच घडवलेले आहे, असा टोला यावेळी खडसे यांनी लगावला आहे.

महाजन अर्ध्या खात्याचे मंत्री!

गिरीश महाजन म्हणतात, मी ३५ वर्षापासून आमदार आहे. मी ३६ वर्षात आहे. गिरीश महाजन हे अर्ध्या खात्याचे मंत्री आहेत. मी १८ खात्यांचे कॅबिनेट मंत्रीपद भोगले आहे. त्यांना पूर्ण खाते सुद्धा मिळाले नाहीं, असा टोला त्यांनी गिरीश महाजन यांना लगावला.

बाजारभाव

फळभाज्यांचे प्रती जाळी दर

शेतमाल	किमान भाव	कमाल भाव	सरासरी भाव
टमाटा	४००	१०००	८००
वांगी	१००	२५०	१५०
फ्लॉवर	१००	२००	१४०
कोबी	९०	१५०	१२०
ढोबळी	२५०	४५०	३५०
भोपळा	१००	२००	१५०
कारले	३००	४००	३५०
दोडका	३५०	५००	४५०
गिलके	२००	३५०	३००
भेंडी	२५०	४००	३४०
काकडी	२५०	४००	३००

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	८९०२	५००	१९०१	१३७५
विंचूर	७१५५	५००	१६१६	१३५०
निफाड	बंद	--	--	--
सायखेडा	४१९०	७६१	१३२५	११७५
पिंपळगाव	११०००	८००	१९००	१३५०

आर्मी स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस

देवळाली कॅम्प । येथील आर्मी पब्लिक स्कूल मध्ये २६ वा कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी कारगिल युध्दाचे दृश्य सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सशस्त्र दलांमध्ये कार्यरत असलेल्या पालकांसाठी, हाताने बनवलेली कार्डे देऊन कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

चव्हाण विद्यालयात कारगिल विजय दिवस

इंदिरानगर । वार्ताहर

श्रीमान टी. जे. चौहान (बिटको) हायस्कूल, मोरवाडी विद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर मुख्याध्यापिका उज्ज्वला माळी, पर्यवेक्षक कीर्तिकुमार गहाणकरी तसेच प्रमुख पाहुणे माजी सैनिक विठ्ठलसिंग राजपूत उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यालयातील विद्यार्थीनींनी सीमेवरील जवानांसाठी राख्या बनवल्या. विठ्ठल सिंग राजपूत यांनी भाषणात युद्धातील अनुभव सांगून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम जागवले. सर्वांनी 'जय हिंद, वंदे मातरम'च्या घोषणा दिल्या. संपूर्ण शाळा देशभक्तीच्या रंगात रंगली होती. सूत्रसंचालन तनुजा शहाणे यांनी केले.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९८५००
२२ कॅरेट	९०६२०
चांदी (प्रति किलो)	
११४०००	

पाथर्डी फाटा येथे आरोग्य शिबिर

इंदिरानगर । वार्ताहर

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ३१ चे विभाग प्रमुख संदेश एकमोडे व साईशक्ती मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर व नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते.

शिवसेनेचे उपनेते दत्ता गायकवाड यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. सेव्हन स्टार हॉस्पिटलचे संचालक डॉ. हेमंत आवारे व रामोळे आय केअरचे भागवत कुंभार यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवसेनेचे सुभाष गायधनी, बंडू दळवी, धनंजय गवळी, मदन ढेमसे, दादा मेढे, सिद्धेश नागरे, चेतन सोनवणे, कृष्णा हळदे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी साईशक्तीचे अण्णासाहेब वाणी, संजय गायकवाड, योगेश चौधरी, खंडेराव मोरे, संपत जाधव, गौरव शेरताटे आदींनी परिश्रम घेतले.

वृद्धाश्रमात अन्नदान

मानवसेवा केंद्र वृद्धाश्रम, पाथर्डी फाटा येथे पक्षाच्या महिला उपजिल्हाप्रमुख शोभा दोंदे यांच्यावतीने अन्नदान आयोजित केले होते. यावेळी माजी आमदार वसंत गीते, विनायक पांडे, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महिला जिल्हाप्रमुख स्वाती पाटील, महानगरप्रमुख प्रथमेश गीते, सुभाष गायधनी, बंटी दोंदे, मदन ढेमसे, दादा मेढे उपस्थित होते.

निकाल
महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र तेजस्विनी मासिक सोडत
तिकीट किं. रु. 200/- • सोडत क्रमांक 07 • सोडत दिनांक 26/07/2025

मालिका	TJ-00	TJ-01	TJ-02	TJ-03	TJ-04	TJ-05	TJ-06	TJ-07	TJ-08	TJ-09
पहिले बक्षिस रु. 5 लाख (रु. 5 लाखाची 10 बक्षिसे)	9540	5630	3312	1771	3992	3327	2245	1187	4326	1721
सर्व मालिकांसाठी ● FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES ● सर्व मालिकांसाठी										
दुसरे बक्षिस रु. 10,000/-	1454	2592	3197	4370	4594	4740	7732	8038	9379	9454
तिसरे बक्षिस रु. 5000/-	0558	1313	2558	3334	4850	5527	6046	8114	8329	9207
चौथे बक्षिस रु. 2000/-	0219	1898	3702	5022	5231	5610	5785	7367	8064	8188
पाचवे बक्षिस रु. 1000/-	0458	0814	4802	5809	6407	7951	8511	9356	9624	9685

सहावे बक्षीस रु. 500/- (सर्व मालिकांसाठी)

सहावे बक्षीस रु.500/-												
		1217	2087	2810	3732	4433	4888	5798	6316	6769	7759	8577	9234
		1312	2128	2826	3785	4436	4913	5845	6319	6784	7764	8578	9342
		1315	2148	2974	3806	4438	4955	5851	6338	6813	7768	8586	9356
0000	0656	1316	2150	3034	3834	4443	5025	5857	6364	6841	7771	8592	9361
0002	0684	1345	2211	3045	3873	4448	5045	5859	6366	7019	7781	8614	9371
0007	0723	1360	2229	3053	3883	4457	5051	5873	6368	7027	7792	8680	9394
0018	0744	1405	2247	3101	3894	4483	5058	5881	6393	7106	7806	8718	9423
0022	0750	1493	2249	3193	3900	4487	5109	5886	6406	7118	7817	8728	9424
0033	0756	1523	2252	3239	3911	4575	5125	5950	6416	7139	7862	8769	9481
0063	0831	1549	2258	3263	3937	4580	5151	5953	6464	7152	7908	8793	9500
0090	0902	1571	2272	3270	3999	4594	5157	5956	6474	7160	7980	8812	9506
0094	0910	1586	2296	3271	4004	4617	5167	5999	6517	7165	8022	8836	9579
0110	0911	1613	2325	3277	4008	4645	5197	6011	6552	7168	8028	8870	9609
0120	0950	1657	2353	3315	4024	4648	5310	6018	6561	7205	8080	8887	9709
0141	0959	1693	2368	3327	4043	4658	5354	6026	6576	7211	8083	8917	9712
0220	0970	1740	2374	3328	4076	4676	5365	6067	6594	7225	8120	8919	9791
0304	0987	1799	2420	3338	4080	4689	5375	6078	6631	7235	8123	8930	9792
0307	1007	1800	2521	3350	4118	4707	5421	6102	6637	7254	8188	8951	9796
0356	1015	1804	2537	3375	4134	4712	5473	6133	6638	7320	8203	8995	9812
0388	1018	1807	2552	3393	4141	4734	5513	6138	6646	7351	8276	9047	9890
0438	1029	1811	2565	3443	4144	4758	5528	6179	6647	7371	8288	9088	9906
0480	1051	1812	2572	3462	4162	4815	5567	6190	6650	7428	8327	9089	9909
0506	1102	1816	2629	3483	4166	4821	5594	6206	6653	7463	8422	9109	9914
0546	1105	1910	2686	3503	4168	4823	5599	6207	6660	7560	8448	9114	9928
0553	1125	1929	2722	3513	4244	4834	5657	6223	6665	7699	8466	9156	9929
0615	1151	1941	2725	3515	4245	4840	5684	6226	6666	7721	8484	9197	9931
0623	1164	1980	2736	3581	4319	4847	5749	6233	6671	7737	8508	9205	9935
0624	1179	2061	2798	3668	4425	4850	5750	6242	6686	7751	8515	9209	9977
0648	1184	2084	2799	3706	4428	4882	5770	6264	6688	7755	8573	9220	9985

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी